# घर मनातलं ...

घर मनातलं ... हा माझा विषय आहे. याच शीर्षकाचा एक सांगीतिक अभिवाचनाचा कार्यक्रम सादर करण्यासाठी मी जमवाजमव करतो आहे.
यामध्ये कविता आणि गद्य उतारे यांचा समावेश असावा,वाचनाला आवश्यक तेथे अनुरूप पार्श्वसंगीताची जोड असावी तसेच काही कविता गाऊन सादर कराव्यात अशी कल्पना आहे.
साधारणतः दीडेक तासाचा कार्यक्रम व्हावा असे वाटते यासाठी सकाळचे संपादक मल्हार अरणकल्ले यांनी लेखन करण्याचे मान्य केले आहे.
संहिता लेखनासाठी संदर्भ म्हणून मी त्यांना पुढील साहित्य दिले आहे

'मराठी कवितेतील घर' हा प्रा.शीला निपुणगे यांनी संपादित केलेला संकलित काव्यसंग्रह आणि याच शीर्षकाचा दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेला एक विस्तृत लेख दिला आहे. याशिवाय अशोक कोठावळे संपादित 'लेखकाचे घर' हा ललित मासिकात प्रकाशित लेखांचा संग्रह दिला आहे. मौजेने प्रकाशित केलेले माधव आचवलांचे 'किमया' हे पुस्तक आणि व पु काळेंचे 'घर हरवलेली माणसं' इत्यादी पुस्तके दिली आहेत.

'मराठी साहित्यातील घर' याचा वेध घेणारे काही गद्य उतारेही यामध्ये असावेत अशी कल्पना आहे. यावर संहिता लेखनाचे काम सुरू आहे. रविवार दि. २६ एप्रिल २०२० ' रोजी पुण्यामध्ये अभिवाचनाचा पहिला प्रयोग करावा यादृष्टीने मी प्रयत्न करीत आहे.

आपले सहकार्य अपेक्षित आहे. बाकी समक्ष भेटीत बोलू.
धन्यवाद !

**राजेंद्र देशपांडे**
**+91 93710 27997**
Rajendra M Deshpande WhatsApp no

**प्रेषक - अशोक चौधरी**